महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १३३/प्रनिप्रा/१२६४ दिनांक : 01 JUN 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, **दिनांक १८ मे, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ६१ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी वैद्य जातवेद ज. पवार, २) डॉ. एम.बी. निकम, प्रशासकीय अधिकारी तथा परिक्षा समन्वयक, कृषी शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई व ३) श्री. सिध्देश नर, परिक्षा समन्वयक, आयुष / वैद्यकीय शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

<u>विषय क्रमांक १:</u> <u>खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १८/०५/२०२२ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | पदव्युत्तर पदवी आयुर्वेद |
| | | दुपारी ०३:०० वा. | | पदव्युत्तर पदवी होमिओपॅथी |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक बैठक-१८२२/प्र.क्र.१०३/प्रनिप्रा/४६६, दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाची ६१ क्रमांकाची बैठक बुधवार दिनांक १८ मे २०२२ रोजी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर पदवी आयुर्वेद व होमिओपॅथी या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित करण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आयुष अभ्यासक्रमांच्या प्रवेश बंद दिनांक (Cut-off-date) केंद्र शासनाच्या संबंधीत विभागांनी दिनांक २०/०५/२०२२ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे व या संदर्भात राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने दिनांक १३/०५/२०२२ रोजीची सुचना प्रसिध्द केलेली आहे. या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर पदवी आयुर्वेद व होमिओपॅथी या अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी आयोजित केलेली क्रमांक ६१वी बैठक दिनांक २२/०६/२०२२ रोजी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि या अभ्यासक्रमामध्ये सद्यस्थितीमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत महाविद्यालय निहाय आढावा घेण्यात आला.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदव्युत्तर पदवी आयुर्वेद व होमिओपॅथी या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता संबंधीत विद्यार्थ्यांनी प्रवेशावेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या पोर्टलवर सादर केलेल्या प्रमाणपत्र/कागदपत्रांची निवडक पध्दतीने छाननी/तपासणी करण्यात आली व दरम्यान काही प्रवेशित विद्यार्थ्यांनी प्रवेश घेते वेळी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांमध्ये संधिग्दता दिसून आली, तद्नंतर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले,-

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी आयुर्वेद व होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense व ४) Orphan या संवर्गातून विद्यार्थी प्रवेशित असतील, तर अशा सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या अनुषंगाने प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या दिनांक २२/०६/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

संबंधित महाविद्यालयांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्रवेश मान्यता प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास प्राप्त झाल्यानंतर तसेच प्राधिकरण स्तरावर १% प्रवेशांची पडताळणी व उक्त नमूद केल्यानुसार प्रमाणपत्रांची तपासणी/छाननी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी आयुर्वेद व होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत निर्णय घेण्यात येईल.

**<u>विषय क्रमांक २ :</u>** **<u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

(क) <u>राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामध्ये निव्वळ कंत्राटी तत्वावर नव्याने नियुक्ती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांबाबत.</u>

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावर कार्यरत श्री. अनिल दादा आहेर, शिपाई दिनांक २३/०९/२०२१ रोजी पासून विनावेतन अनुपस्थित असल्याने, त्यांचे जागी श्री. नागेश दत्तात्रय

(ज. पी.)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

नुपनारायण यांची शिपाई पदावर तसेच श्री. राजेश सदाशीव जाधव यांची जन संपर्क अधिकारी या पदावर निव्वळ कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या दिनांक १८/०५/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांकरिता किंवा पुढील आदेश होईपर्यंत, या पैकी जे अगोदर होईल त्यानुसार नियुक्ती करण्याबाबत आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 1/6/22